२१.


महाराष्ट्र शासन
संचालनालय स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य.
कोंकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई.

:- 022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com


३७७१४

कार्यालयीन आदेश क्रमांक ७८ दिनांक 20 DEC 2008

विषय :- थकीत लेखापरीक्षण, अनुपालन तपासणी उपाय योजना व अनुपालन निपटारा.

या विभागापुढे असलेल्या थकीत लेखापरीक्षणाच्या निपटाऱ्याचे आव्हान विचारात घेता त्याबाबत करावयाची उपाययोजना म्हणून कार्यालयीन आदेश क्रमांक ४ दिनांक २४.२.१९८९ आणि कार्यालयीन आदेश क्रमांक ५ दिनांक १.१.१९९१ रद्द करण्यात येत असून, यापुढे मासिक सभेचा कालावधी दरमहा तीन दिवस राहील असे आदेश देण्यात येत आहे. या सुधारीत ३ दिवसांच्या मासिक सभेच्या कालावधीत मासिक सभेची सर्व कामे तसेच अनुपालन तपासणी इ. कामे करण्यात यावीत. ह्यामुळे उपलब्ध होणारे दरमहाचे दोन दिवस लेखापरीक्षणासाठी पूर्णपणे वापरावेत. ज्या ग्रामपंचायत लेखापरीक्षकांना अन्य जिल्ह्यातील थकीत लेखापरीक्षण कामासाठी तात्पुरते वर्ग केले आहे त्यांना या तीन दिवसांशिवाय एक दिवस मूळ मुख्यालयी अनुज्ञेय राहील.

२. थकीत लेखापरीक्षण निपटाऱ्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून कार्यालयीन आदेश क्र.१० दिनांक ४.५.१९९०, कार्यालयीन आदेश क्रमांक १८ दिनांक १८.३.१९९८, कार्यालयीन आदेश क्रमांक ५१ दिनांक १६.५.२००० व कार्यालयीन आदेश क्रमांक १८ दिनांक २४.१.२००१ रद्द करण्यात येत असून यापुढे कोणत्याही लेखापरीक्षणासाठी, हे आदेश निरस्त केल्यामुळे, असणाऱ्या मंजूर श्रमदिनापेक्षा जास्त श्रमदिनास मुख्य लेखापरीक्षक यांची पूर्व मान्यता आवश्यक राहील. त्यासाठी, लेखापरीक्षण सुरु झाल्याबरोबर आढावा घेऊन जादा श्रमदिनाची गरज आढळल्यास त्याबाबत योग्य त्या माहिती व समर्थनासह प्रस्ताव लेखापरीक्षण सुरु केल्यानंतर तीन दिवसांत उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) व मुख्य लेखापरीक्षक यांना लेखापरीक्षण पथक प्रमुखाने थेट पाठवावेत. जेथे जिल्हा उपमुख्य लेखापरीक्षक पथक प्रमुख नसतील तेथे त्यांना अशा प्रस्तावाची प्रत लेखापरीक्षण पथक प्रमुखांने द्यावी. उपमुख्य लेखापरीक्षक व उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) यांनी त्यांचे अशा प्रस्तावावरील अभिप्राय तीन दिवसांत मुख्य लेखापरीक्षकांना मिळतील असे पाठवावेत म्हणजे अशा प्रस्तावावर त्वरेने निर्णय घेणे शक्य होईल. परंतु कोणत्याही परिस्थितीत पूर्व मंजूरी शिवाय जादा श्रमदिनास मंजूरी गृहीत धरुन मंजूरीपेक्षा जादा श्रमदिन घेऊ नयेत किंवा लेखापरीक्षण अपूर्ण ठेवू नये.

३. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या थकीत परिच्छेदांची संख्या खूप असल्याने त्यांच्या निपटाऱ्याबाबत शासनाचा पाठपुरावा चालू आहे. त्यास अनुसरुन या विभागाने या स्थानिक संस्थाकडून आलेले पूर्तता अहवाल लवकर तपासून कार्यवाही करणे जरुर आहे. त्यासाठी मासिक सभा कालावधीत स्थानिक निधी लेखापरीक्षक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अनुपालन तपासणीचे काम आणि भार- अधिभार प्रकरणांचीही स्थिती अद्ययावत आणण्यासाठी दीड दिवस वेळ द्यावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत लेखापरीक्षकांनी या कालावधीत जुने अहवाल (काही ठिकाणी भाग-१ मध्ये पूर्वीचे अहवाल उपलब्ध नाहीत असे नमूद केले जाते ते अयोग्य आहे) पडताळून भाग-१ अद्ययावत आणावेत तसेच अपहार प्रकरणांचेही अभिलेख अद्ययावत आणावेत.

हे आदेश त्वरीत अंमलात येतील.

२०/१२/०८
( अ.बा.सावंत ),
मुख्य लेखापरीक्षक ,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य.

-प्रत :- १) उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती.

२) उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, ______________.

BHP/C-A/ASA-Doc2/